तात्काळ

महाराष्ट्र शासन

**क्रमांक**: टीसीएम- २०११/(२२७/११)/माशि-४
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ मार्च, २०१२

प्रति,
(१) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
(२) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

विषयः- राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त ६ अध्यापक विद्यालयांना संलग्नता देण्याबाबत...

संदर्भ :- संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांची पत्रे
१) क्र. मराशैसंप्रप/शिशिप्रशा-५/५८९२/NCTE/२०११-१२/दि. १९.११.२०११
२) क्र. मराशैसंप्रप/शिशिप्रशा-५/६४०३/NCTE/२०११-१२/दि. ८.१२.२०११
३) क्र. मराशैसंप्रप/शिशिप्रशा-५/४५७/NCTE/२०११-१२/दि. ६.२.२०१२

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी संदर्भाधीन पत्रांन्वये उपरोक्त विषयाबाबतचे नकारार्थी प्रस्ताव शासनास पाठविले आहेत. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्रमांक ६१९/२०१२- अनमोल शिक्षण प्रसारक मंडळ विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणाच्या अनुषंगाने एन.सी.टी.ई., भोपाळ यांनी सन २०११-१२ मध्ये मान्यता दिलेल्या याचिकाकर्त्यां अध्यापक विद्यालयास संलग्नता देऊन विद्यार्थी प्रवेशित करण्याची परवानगी देण्याबाबत मा.न्यायालयाने दिनांक २७.२.२०१२ रोजी आदेशित केले आहे. (सदर आदेशाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.) त्यानुसार एन.सी.टी.ई.भोपाळ यांनी मान्यता दिलेल्या व शासनास प्राप्त झालेल्या पुढील ६ अध्यापक विद्यालयांना शासनाची संलग्नता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | एन.सी.टी.ई., भोपाळ यांचे मान्यता आदेशाचा दिनांक | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | कै.दादासाहेब मार्तंडशेट सोनार, डी.एड. कॉलेज, आडगाव, जि.नाशिक | २०/९/२०११ | ५० |
| २ | श्री.ओम नमः प्रतिष्ठान रामजी पवार डी.एड. कॉलेज, तडमुगली, ता.निलंगा, जि.लातूर | २०/९/२०११ | ५० |
| ३ | श्रीकृष्ण अवधूत डी.एड.कॉलेज, कोकणा (नवेगाव) बांध तहसील सडक अर्जुनी, जि.गोंदिया | २०/९/२०११ | ५० |
| ४ | कै.बळीराम रवि कोल्हे स्मृती संस्था संचलित अध्यापक विद्यालय मन्याखेडा, जि.जळगांव | २०/९/२०११ | ५० |
| ५ | श्रीमंत राजे शिव छत्रपती प्रतिष्ठाणचे अध्यापक विद्यालय, वैराग रोड, माठा जि.सोलापूर | २८/९/२०११ | ५० |
| ६ | श्री.महालक्ष्मी शिक्षण मंडळ, कै.मनुभाई माळवे, डी.एड.कॉलेज, पंढरपूर, जि.सोलापूर | २८/१२/२०११ | ५० |

प्राचार्य
श्रीकृष्ण अवधूत डी. एड. कॉलेज
कोकणा/न.सडक अर्जुनी जि. गोंदिया

२. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी एन.सी.टी.ई. अधिनियमातील तरतूदीस अनुसरुन पुढील बाबींची खातरजमा करावी :-

१) संस्थेकडे एनसीटीईच्या प्रमाणकानुसार मुलभूत सुविधा. शिक्षक वर्ग यांची पडताळणी करावी. त्यात उणिवा आढळल्यास संबंधित प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांना जबाबदार धरण्यात यावे.

२) प्रस्तुत प्रकरणी याचिका क्र.६१९/२०१२ अनमोल शिक्षण प्रसारक मंडळ - विरुध्द - महाराष्ट्र शासन च्या संदर्भात न्यायालयाने दिनांक २७/२/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर प्रकरणी संबंधितांना संलग्नतेचे आदेश तात्काळ द्यावेत व त्यानुसार आपला अहवाल शासनास सादर करावा.

३) अध्यापक विद्यालयांचे अभिलेख आपल्या स्तरावर **कायम अभिलेख** म्हणून जतन करुन ठेवावेत. सदर अध्यापक विद्यालयांची मान्यता ही **कायम विनाअनुदान** तत्वावर राहील. सदर अध्यापक विद्यालयांच्या नविन तुकडीस रु.२,००,०००/- प्रमाणे प्रवेश प्रक्रीया शुल्क आकारण्यात यावे.

३. उपरोक्त सुचनांनुसार कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.

(अ.अ.गावडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) कै.दादासाहेब मार्तंडशेट सोनार, डी.एड. कॉलेज, आडगाव, जि.नाशिक
२) श्री.ओम नमः प्रतिष्ठान रामजी पवार डी.एड. कॉलेज, तडमुगळी, ता.निलंगा, जि.लातूर
३) श्रीकृष्ण अवधूत डी.एड.कॉलेज, कोकणा (नवेगांव) बांध तहसील सडक अर्जुनी, जि.गोंदिया
४) कै.बळीराम रवि कोल्हे स्मृती संस्था संचलित अध्यापक विद्यालय मन्याखेडा, जि.जळगांव
५) श्रीमंत राजे शिव छत्रपती प्रतिष्ठाणचे अध्यापक विद्यालय, वैराग रोड, माढा जि.सोलापूर
६) श्री.महालक्ष्मी शिक्षण मंडळ, कै.मनुभाई माळवे, डी.एड.कॉलेज, पंढरपूर, जि.सोलापूर
७) निवड नस्ती (मशि-४)

प्राचार्य
श्रीकृष्ण अवधुत डी. एड.कॉलेज
कोकणा,ता.सडक अर्जुनी जि.गोंदिया